महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात दिनांक : २८ एप्रिल, २०२३

**-: शुद्धीपत्रक :-**

**विषय : महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ (जाहिरात क्रमांक ११/२०२३)**
अन्न व औषध प्रशासकीय सेवेतील 'सहायक आयुक्त अन्न, गट-अ' आणि 'अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब' या संवर्गांकरिता 'बी. टेक., कृषि अभियांत्रिकी पदवीधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या मागणीपत्रानुसार अन्न व औषध प्रशासन सेवेतील सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब या संवर्गाच्या भरतीकरिता दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात व दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्रमांक ४८०/२०२३ प्रकरणी दाखल संकीर्ण अर्ज क्रमांक ३०१/२०२३ व ३९४/२०२३ संदर्भात मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये **'बी. टेक., कृषि अभियांत्रिकी.'** पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची मुभा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर मूळ अर्जावरील मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून, सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब या संवर्गाकरीता **'बी. टेक., कृषि अभियांत्रिकी.'** उमेदवारांना अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे :-

**२.१** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेतील इतर सेवांकरीता अर्ज सादर केलेल्या तथापि, अन्न व औषध प्रशासन सेवेकरीता विकल्प सादर करू शकले नाहीत अशा **बी. टेक., कृषि अभियांत्रिकी** पदवी धारक उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईल मध्ये प्रस्तुत संवर्गाकरीता Recheck Eligibility या पर्यायाद्वारे पात्रता तपासून पात्र असल्यास केवळ अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब तसेच सहायक आयुक्त अन्न, गट-अ संवर्गाकरीता विकल्प सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**२.२** महाराष्ट्र नागरी सेवा परीक्षेकरीता अर्ज सादर केला नाही तथापि, नव्याने अन्न व औषध प्रशासन सेवेकरीता अर्ज सादर करण्यास इच्छुक असतील अशा फक्त **बी. टेक., कृषि अभियांत्रिकी** पदवी धारक उमेदवारांकरीता केवळ अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब तसेच सहायक आयुक्त अन्न, गट-अ संवर्गाकरीता अर्ज सादर करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**३.** सहायक आयुक्त अन्न, गट-अ आणि अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब संवर्गाकरीता वर नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक २९ एप्रिल, २०२३ रोजी १४.०० वाजल्यापासून<br>दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी २३.५९ पर्यंत** |
| २ | **ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक ०१ मे, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ०२ मे, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**४.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सनिव २०१३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय राहील.

**५.** इतर सर्व अटी व तरतुदी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

**६.** सदर शुद्धीपत्रक, मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२३ तसेच दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीचे शुद्धीपत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई